तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २६ फेब्रुवारी २०२५

आतील पानावर

पान २– 'नो एन्ट्री २' मध्ये दिसणार अर्जुन कपूर
पान ३– हर्षवर्धन राणे 'या' रोमँटिक चित्रपटात....
पान ४– विजय देवरकोंडासोबत झळकणार भाग्यश्री ...
पान ६– समंथा रक्त ब्रम्हाडमध्ये दिसणार ॲक्शन....
पान ६– ...ते आपल्याला पाण्यात बघतात

# महादेवाच्या अवतारात दिसणार प्रभास





रिबेल स्टार अशी ओळख असलेला प्रभास  हा सर्वांचा लाडका अभिनेता. प्रभासच्या विविध सिनेमांमधून भूमिका साकारुन सर्वांचं मन जिंकलंय. प्रभासने 'बाहुबली' सिनेमातून भारतात नव्हे तर जगभरात त्याच्या अभिनयाचा डंका वाजवला. प्रभासने कायमच विविध भूमिका साकारुन लोकांना आश्चर्याचा सुखद धक्का देत असतो. प्रभासच्या आगामी सिनेमाचे पहिलं पोस्टर रिलीज झालंय. या पोस्टरमध्ये प्रभासचा महादेव अवतार पाहून सर्वचजण थक्क झालेत.  सुपरस्टार प्रभासचा आजवरचा वेगळा सिनेमा म्हणून 'कन्नप्पा' सिनेमाकडे पाहिलं जातंय. 'कन्नप्पा'मध्ये याआधी अक्षय कुमारचा महादेवाचा अवतारातील लूक पाहायला मिळाला. आज नुकतंच प्रभासचा भगवान शंकराचा रुपातील फोटो व्हायरल झालाय. यात कपाळी भस्म, गळ्यात रुद्राक्ष असलेल्या लूकमध्ये प्रभास बघायला मिळतोय. प्रभासचा हा महादेवाचा लूक समोर येताच चाहत्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केलाय. 'कन्नप्पा' सिनेमा हा साउथचा बिग बजेट सिनेमा आहे. या सिनेमाची रिलीज डेटही अधिकृतरित्या जाहीर करण्यात आलीय. हा सिनेमा २५ एप्रिल २०२५ ला रिलीज होणार आहे. 'कन्नप्पा' हा एक काल्पनिक सिनेमा असून शिवभक्त कन्नप्पावर हा सिनेमा आधारीत आहे. या सिनेमात अक्षय कुमार झळकणार असून या सिनेमाच्या माध्यमातून अक्षय कुमार तेलुगु सिनेमाइंडस्ट्रीत पदार्पण करतोय. प्रभासही या सिनेमात झळकणार असल्याने सर्वांची उत्सुकता शिगेला आहे. विशेष म्हणजे दोघंही सुपरस्टार महादेवाच्या भूमिकेत दिसणार आहेत.



# 'डब्बा कार्टेल'चा जबरदस्त ट्रेलर प्रदर्शित

'डब्बा कार्टेल' या नव्या शोची घोषणा केली आहे. महिला ड्रग माफियांवर आधारित या शोचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. या शोचे दिग्दर्शन हितेश भाटिया यांनी केले आहे आणि फरहान अख्तर आणि रितेश सिधवानी यांनी निर्मिती केली आहे. 'डब्बा कार्टेल'ची कथा ठाणे, मुंबई येथे राहणाऱ्या ५ महिलांभोवती फिरते, या सामान्य महिलांप्रमाणे टिफिन सेवा चालवतात. मात्र, जेव्हा या महिला टिफिन सेवेच्या नावाखाली ड्रग माफिया चालवत असल्याचे समोर येते तेव्हा ट्विस्ट पाहायला मिळतो. शोच्या ट्रेलरमध्ये आपल्याला याची झलक दिसते. हा ट्रेलर पाहिल्यानंतर या शोची उत्सुकता आणखी वाढली आहे. नेटफ्लिक्सचा हा आगामी शो २८ फेब्रुवारीपासून ओटीटीवर प्रसारित होणार आहे. यामध्ये शबाना आझमी, गजराज राव, ज्योतिका, निमिषा सजयन, शालिनी पांडे, अंजली आनंद, सई ताम्हणकर, जिशु सेनगुप्ता, लिलेट दुबे आणि भूपेंद्र सिंग जादावत यांसारखे दिग्गज कलाकार मुख्य भूमिकेत दिसतील. गेल्या वर्षी संजय लीला भन्साळीचा 'हिरामंडी' वेबसिरिज नेटफ्लिक्सवरही आली, ज्यात महिला मुख्य भूमिकेत होत्या. या शोला चांगला प्रतिसाद मिळाला. आता स्त्रियांवर आधारित डब्बा कार्टेल' या शोचा प्रेक्षकांवर किती परिणाम करणार? हे पहावे लागणार आहे.



# 'नो एन्ट्री २' मध्ये दिसणार अर्जुन कपूर

बॉलिवूड अभिनेता अर्जुन कपूर सध्या त्याच्या आगामी रोमँटिक कॉमेडी चित्रपट 'मेरे हसबंड की बीवी'च्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. त्याच्यासोबत भूमी पेडणेकर आणि रकुल प्रीत सिंग देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. यानंतर अर्जुन 'नो एंट्री २' या चित्रपटात दिसत आहे. वरुण धवन आणि दिलजीत दोसांझ देखील या चित्रपटात आहेत. नुकतेच प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना अर्जुनला त्याच्या 'नो एन्ट्री २' या चित्रपटाबद्दल विचारण्यात आले. त्यावेळी तो म्हणाला की, यासाठी अजून वेळ आहे, पण कॉमेडी हा एक प्रकार आहे जो प्रत्येकाला थिएटरमध्ये पाहायला आवडतो. कौटुंबिक प्रेक्षकांसाठी कॉमेडी हा महत्त्वाचा प्रकार आहे, मग त्यात रोमान्स असो वा नाटक. अर्जुन पुढे म्हणाला, तुम्ही एकत्र बसून लोकांना हसवू शकत असाल तर यापेक्षा चांगली भावना नाही. अर्जुन कपूरने सांगितले की, त्याने ॲक्शन, ड्रामा आणि काही कॉमेडी चित्रपट केले आहेत. अनीस बझ्मींसोबत 'मुबारकां'मध्ये काम करण्याचा अनुभव सांगितला आणि आता पुन्हा दिग्दर्शकासोबत काम करण्याची संधी मिळत असल्याचे त्याने सांगितले. 'नो एन्ट्री २'चे शूटिंग लवकरच सुरू होईल, अशी आशा अर्जुनने व्यक्त केली. तो म्हणाला, 'जेव्हा मी अधिक तपशील देऊ शकेन तेव्हा देईन. पण हो, मेरे हसबंड की बीवी नंतर मी आणखी कॉमेडी चित्रपट करण्यास उत्सुक आहे. अर्जुन कपूरचा आगामी चित्रपट 'मेरे हसबंड की बीवी' २१ फेब्रुवारी २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. वाशू भगनानी यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे आणि दिग्दर्शक मुदस्सर अझीझ आहेत, ज्यांच्या दिग्दर्शनाखाली 'खेल खेल में' गेल्या वर्षी २०२४ मध्ये प्रदर्शित झाला होता.

# अजय देवगणने नाकारली होती पाकिस्तानी मेजरची भूमिका?



बॉलिवूड अभिनेता अजय देवगणने त्याच्या चित्रपटांच्या लिस्टमध्ये अनेक हिट सिनेमे दिले. या लिस्टमध्ये त्याचा फूल और काँटे हा सिनेमा प्रथमस्थानी येतो. या सिनेमाने अजय देवगणला ओळख मिळवून दिली. त्यानंतर बॉलीवूडमध्ये त्याच्या चित्रपटांची घौडदोड कायम राहिली. त्याच काळात अजयला बर्फ या चित्रपटाची ऑफर देण्यात आली होती. अजयलाही त्या सिनेमाची स्क्रिट आवडली होती. मात्र, त्याने सिनेमात अभिनय करण्यास नकार दिला. याबाबत आता हा चित्रपट बनवणारे अब्बास टायरवाला यांनी अजयने का नकार दिला होता याबाबत खुलासा केला आहे. बर्फ चित्रपटाचे दिग्दर्शन अब्बास टायरवाला आणि विशाल भारद्वाज एकत्र मिळून करणार होते. चित्रपटाची स्क्रिप्ट ऐकून अजय रोमांचित झाला, पण त्याने चित्रपट करण्यास नकार दिला. 'बर्फ' हा चित्रपट भारत-पाकिस्तानवर आधारित प्रेमकथा होता. ज्यामध्ये मनोज बाजपेयी आणि सुष्मिता सेन यांच्या देखील प्रमुख भूमिका असणार होत्या. तो काळ आमच्या आयुष्यातील सर्वात कठीण काळ होता. हा चित्रपट माझ्यासाठी रोमांचक होता. विशालने हा चित्रपट अजय देवगणकडे नेला. त्यातील पुरुष पात्र ही पाकिस्तानी मेजरची भूमिका होती. त्या भूमिकेसाठीच अजयला विचारणा करण्यात होती. पण अजयने ही भूमिका करण्यास नका दिला. जेव्हा अजयने स्क्रिप्ट वाचली तेव्हा तो म्हणाले की, यापेक्षा सुंदर स्क्रिप्ट मी अनेक वर्षांपासून वाचलेली नाही. पण सध्या मी माझ्या करिअरच्या ज्या टप्प्यावर आहे, त्या टप्प्यावर पाकिस्तानी मेजरची भूमिका साकारणे माझ्यासाठी अवघड आहे.

# हर्षवर्धन राणे 'या' रोमँटिक चित्रपटात झळकणार



बॉलिवूड अभिनेता हर्षवर्धन राणे सध्या चांगलाच चर्चेत आला आहे. याचं कारण म्हणजे हर्षवर्धन राणे आणि मावरा होकेन यांची मुख्य भूमिका असलेला 'सनम तेरी कसम' हा चित्रपट आता पुनःप्रदर्शित करण्यात आला आहे. २०१६ मध्ये प्रदर्शित झालेला चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला होता. मात्र, आता ७ फेब्रुवारीला चित्रपट रि-रिलीज केल्यानंतर चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली आहे. दरम्यान, आता व्हॅलेंटाईन डे च्या निमित्ताने हर्षवर्धन राणेने चाहत्यांना अनोखं खास सरप्राईज दिलं.

'सनम तेरी कसम' नंतर हर्षवर्धन राणे पुन्हा एकदा रोमँटिक चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'व्हॅलेंटाईन डे'च्या दिवशी हर्षवर्धन राणेने त्याच्या आगामी चित्रपटाचे पहिले पोस्टर शेअर करत नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. अभिनेत्याने नुकतीच सोशल मीडियावर आपल्या अपकमिंग प्रोक्टबद्दल माहिती देणारी खास पोस्ट शेअर केल्याची पाहायला मिळतेय. 'दीवानियत' असे या चित्रपटाचे नाव असून, हा चित्रपट २०२५ मध्ये प्रदर्शित केला जाण्याची शक्यता आहे. हर्षवर्धन राणेने सोशल मिडियावर या चित्रपटाचं एक पोस्टर शेअर केलं आहे. या पोस्टरच्या कॅप्शनमध्ये लिहिले की, दीवानियत फिल्म कहानी है, प्यार और हार्टब्रेक की ये कहानी साल २०२५ में सिनेमाघरों में आने वाली है.... दरम्यान, या पोस्टमध्ये चित्रपटाच्या रिलीज डेटबद्दल कोणतीही माहिती दिलेली नाही. दिग्दर्शक मिलाप जावेरी 'दीवानियत' या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. तर मुश्ताक शेख यांनी चित्रपटाचं कथानक लिहिलं आहे. सोशल मीडियावर व्हायरल होणारं चित्रपटाचं पोस्टर पाहून चाहत्यांमध्ये हर्षवर्धन राणेच्या या आगामी चित्रपटाबद्दल मनात उत्सुकता निर्माण झाली आहे.

# 'या' अभिनेत्रीची 'क्रिश ४'मध्ये एन्ट्री पक्की?

'क्रिश' सिनेमाचा स्वतःचा एक चाहतावर्ग आहे. 'क्रिश' सिनेमाने लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचं प्रेम मिळवलंय. 'कोई मिल गया', 'क्रिश', 'क्रिश ३' अशा सिनेमांनी बॉक्स ऑफिसवरही चांगली कमाई केली. हृतिक रोशनने या सिनेमात साकारलेली सुपरहिरोची भूमिका प्रेक्षकांना खूप आवडली. आता लवकरच 'क्रिश ४' हा सिनेमा रिलीज होणार आहे. या सिनेमात बॉलिवूडमधील एक दिग्गज अभिनेत्री झळकणार असल्याची हिंट स्वतः सिनेमाचे दिग्दर्शक राकेश रोशन यांनी दिली आहे. कोण आहे ती? काहीच दिवसांपूर्वी ओटीटी नेटफ्लिक्सवर 'द रोशन्स' नावाची डॉक्यूमेंट्री रिलीज झाली. या डॉक्यूमेंट्रीत रोशन कुटुंबाचा संघर्ष आणि यशाचा प्रवास दिसला. या डॉक्यूमेंट्रीची सक्सेस पार्टी नुकतीच साजरी करण्यात आली. राकेश रोशन यांनी ही पार्टी होस्ट केली होती. त्यावेळी दिग्गज अभिनेत्री रेखा सुद्धा या पार्टीत उपस्थित होत्या. पापाराझींनी राकेश रोशन यांना, रेखा 'क्रिश ४'मध्ये दिसणार का? असं विचारलं. त्यावेळी राकेश रोशन म्हणाले की, सर्व काही क्रिश ४ मध्ये आहे. तुम्हाला अनेक गोष्टी बघायला मिळतील. एकूणच राकेश रोशन यांनी दिलेल्या हिंटवरुन हे लक्षात येईल की, 'क्रिश ४'मध्ये रेखा आहेत हे जवळपास निश्चित झालंय. 'क्रिश ४' निमित्ताने सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवलेली लोकप्रिय अभिनेत्री प्रियंका चोप्रा पुन्हा बॉलिवूडमध्ये कमबॅक करणार अशी चर्चा आहे. 'क्रिश' आणि 'क्रिश ३'मध्ये प्रियंका आणि हृतिकची जोडी चांगलीच गाजली. त्यामुळे 'क्रिश ४' निमित्ताने प्रियंका आणि हृतिक पुन्हा एकत्र दिसणार का, याची सर्वांना उत्सुकता आहे. 'क्रिश ४'च्या कथेवर सध्या काम सुरु असून हा सिनेमा २०२६ ला रिलीज होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.





# संतोष जुवेकरला पाहिजे 'अशी' जोडीदार

कलाकारांची लग्नं, त्यांचे जोडीदार, मुले यांच्याविषयी प्रेक्षकांना प्रचंड उत्सुकता असते. आपले आवडते कलाकार लग्न कधी करणार, त्यांचा जोडीदार कोण आहे, त्यांची मुले काय करतात, हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असल्याचे पाहायला मिळते. आता अभिनेता संतोष जुवेकरने त्याला जोडीदार म्हणून कशी मुलगी हवी, यावर वक्तव्य केले आहे. संतोष जुवेकरने नुकताच 'लोकशाही फ्रेंडली'बरोबर संवाद साधला. यावेळी त्याला विचारण्यात आले की तुला तुझी जोडीदार कशी पाहिजे? यावर बोलताना संतोष जुवेकरने हसत उत्तर दिले की सगळ्याच गोष्टी आपल्या इच्छेने होत नाही. पुढे त्याने म्हटले की माझं असं कुठलंही म्हणणं नाहीये. पण, लोक म्हणतात जसं म्हणतात की दिसण्यावर वैगेरे विश्वास ठेवणार नाही, मनाने सुंदर हवी वैगेरे तर मी असं म्हणणार नाही. पण, मला चांगली सुंदर दिसणारी जोडीदार हवी आहे. बाकी माझं काहीच म्हणणं नाहीये. जर भविष्यात मला एखादी मुलगी आवडली आणि मला पुढे समजलं की तिला काहीच येत नाही. तरी मग मी जुळवून घेईन. जर माझं प्रेम असेल ना तर मी सगळं ॲडजस्ट करायला तयार होईन. पण त्याकरिता ती व्यक्ती तितकी आवडली पाहिजे किंवा त्या दृष्टीने मी विचार करायला सुरूवात केली पाहिजे.

सध्या माझं छावा व पुढच्या काही सिनेमांवर लक्ष केंद्रित आहे. त्यावर फोकस करतोय आणि आता ही जी वेळ सुरू झाली आहे, ती आणखी कशी चांगली करता येईल, ती छान मोठी लांब कशी करता येईल, याचा विचार जास्त करतोय. पुढे अभिनेत्याने गंमतीने असेही म्हटले की, मला सुंदर मुलगी जोडीदार म्हणून हवी आहे, असं म्हटल्यामुळे आता मुली मला ट्रोल करतील. तर असं काही नाहीये, नशीबात जे असेल ते होईल. संतोष जुवेकरने सध्या त्याच्या छावा चित्रपटातील लूक व भूमिकेमुळे मोठ्या चर्चेत आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित या चित्रपटात अभिनेत्याने रायाजी ही भूमिका साकारली आहे. या चित्रपटात मुख्य भूमिकेत विकी कौशल दिसत आहे. छत्रपती संभाजी महाराजांची व्यक्तीरेखा विकीने अफलातून साकारली आहे. संतोष जुवेकरने एका मुलाखतीत विकी कौशल छत्रपटी संभाजी महाराजांच्या भूमिकेसाठी योग्य असल्याचे म्हणत त्याचे कारणही सांगितले होते. या चित्रपटात रश्मिका मंदाना, अक्षय खन्नादेखील प्रमुख भूमिकेत दिसत आहेत. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित हा चित्रपट १४ फेब्रुवारीला प्रदर्शित झाला आहे.

# आणखी एका साऊथ चित्रपटात दिसणार जान्हवी कपूर?

गत वर्ष अल्लू अर्जुनसाठी खूप चांगले गेले आहे. त्याच्या 'पुष्पा २' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर प्रचंड कमाई केली. आता तो त्याच्या पुढच्या चित्रपटाबाबत चर्चेत आला आहे. अल्लू अर्जुन दिग्दर्शक त्रिविक्रम श्रीनिवाससोबत काम सुरू करणार होता, परंतु प्रकल्पात काही विलंब झाल्यामुळे तो त्याचे वेळापत्रक बदलू शकतो. आता असे म्हटले जात आहे की हा अभिनेता चित्रपट निर्माते ॲटलीच्या पुढील चित्रपटावर काम करण्यास सुरुवात करणार आहे. आणि यामध्ये जान्हवी कपूर त्याच्यासोबत दिसू शकते. अल्लू अर्जुनला बऱ्याच काळापासून निर्माता-दिग्दर्शक ॲटलीसोबत काम करण्याची इच्छा होती. दरम्यान, जान्हवी कपूर या चित्रपटात अल्लू अर्जुनसोबत दिसू शकते अशी अटकळ बांधली जात आहे. तथापि, अद्याप अशी कोणतीही माहिती अधिकृतपणे समोर आलेली नाही. 'देवरा' चित्रपटानंतर जान्हवी कपूरला तेलुगू प्रेक्षकांमध्ये चांगली ओळख मिळाली आहे. या चित्रपटानंतर जान्हवी बुची बाबू सना दिग्दर्शित राम चरणच्या आगामी चित्रपटातही महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. जान्हवीला अल्लू अर्जुनचा चित्रपट मिळाला तर हा तिचा तिसरा दक्षिण चित्रपट असेल. जान्हवी कपूरच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, ती सध्या तिच्या पुढच्या 'परम सुंदरी' चित्रपटाच्या तयारीत व्यस्त आहे. या चित्रपटात ती सिद्धार्थ मल्होत्रासोबत दिसणार आहे.



# विजय देवरकोंडासोबत झळकणार भाग्यश्री बोरसे



विजय देवरकोंडा स्वत:चा आगामी चित्रपट 'वीडी१२'वरून चर्चेत आहे. वीडी १२ च्या प्रदर्शनापूर्वी या चित्रपटाच्या टीझरची चाहत्यांना प्रतीक्षा आहे. या चित्रपटाला आता 'साम्राज्यम' हे नाव देण्यात आले आहे. विजय देवरकोंडा हा गौतम थिन्नानुरी यांच्याकडून दिग्दर्शित चित्रपटात दिसून येणार आहे. नागा वामसी यांच्याकडून याची निर्मिती केली जात आहे. या चित्रपटाच्या शीर्षकाची अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. बिगबजेट असणार्या या चित्रपटात विजय देवरकोंडसोबत भाग्यश्री बोरसे दिसून येणार आहे. भाग्यश्रीला 'मिस्टर बच्चन'मधील भूमिकेसाठी ओळखले जाते. भाग्यश्रीचा नवा चित्रपट हेरगिरीवर आधारित थ्रिलर धाटणीचा असणार आहे. या चित्रपटाला अनिरुद्ध रविचंदर यांचे संगीत लाभणार आहे. या चित्रपटाचे चित्रिकरण सध्या केले जात असून हा दोन भागांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे. प्रत्येक भागाची कहाणी वेगळी असणार आहे.



# 'दृश्यम ३' कन्फर्म!



२०२३ सस्पेन्स, थ्रिलर सिनेमा म्हटलं की 'दृश्यम' चं नाव येतंच. मूल मल्याळम सिनेमात सुपरस्टार मोहनलाल यांनी भूमिका साकारली. तर हिंदी सिनेमात अजय देवगणने सर्वांना खिळवून ठेवलं. दोन्ही भाषेत सिनेमाचा सीक्वेलही आला. आता सर्वांनाच तिसर्‍या भागाची आतुरता आहे. काही दिवसांपूर्वीच तिसरा भाग दोन्ही भाषेत एकाचवेळी शूट होणार असल्याची चर्चा होती. तर आता स्वत: मोहनलाल यांनीच 'दृश्यम ३' बाबत ट्वीट करत शिक्कामोर्तब केलं आहे. मल्याळम सुपरस्टार मोहनलाल यांनी आज ट्वीट केलं आहे. ते लिहितात, भूतकाळ कधीच शांत बसत नाही. दृश्यम ३ कन्फर्म! यासोबत त्यांनी फोटोही शेअर केला आहे. यामध्ये त्यांच्यासोबत दिग्दर्शक जीतू जोसेफ आणि एंटनी पेरुम्बावूर दिसत आहेत. तिघांनी मिळून सिनेमाच्या तिसऱ्या भागाची अधिकृत घोषणा केली आहे. दृश्यम सिनेमा मूळ मल्याळम असला तरी नंतर तो अनेक भाषांमध्ये डब झाला. जगभरात या सिनेमाला प्रतिसाद मिळाला. अजय देवगणनेही हिंदीत अप्रतिम काम केलं. तर तब्बूने सिनेमात पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारली. तर दुसऱ्या भागात अक्षय खन्ना पोलिस होता. दोन्ही सिनेमे बॉक्स ऑफिसवर तुफान चालले. आता अजय देवगणही तिसऱ्या भागाची घोषणा कधी करतो याकडे सर्वांचं लक्ष आहे.

# शिवरायांच्या भूमिकेत दिसणार ऋषभ शेट्टी



छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती नुकतीच महाराष्ट्रासह देशभरात साजरी झाली. किल्ले शिवनेरीसह विविध ठिकाणी शिवजयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष दिनानिमित्ताने 'कांतारा' फेम अभिनेता ऋषभ शेट्टीच्या 'दी प्राइड ऑफ भारत- छत्रपती शिवाजी महाराज' या सिनेमाचे नवीन पोस्टर समोर आले. 'दी प्राइड ऑफ भारत - छत्रपती शिवाजी महाराज' या चित्रपटात ऋषभ शेट्टी हा शिवरायांची भूमिका साकारणार आहे. गेल्यावर्षीच या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती. त्यावेळी चित्रपटाचे एक पोस्टर देखील समोर आले होते. आता या चित्रपटाचे नवीन पोस्टर समोर आले आहे. या पोस्टरमध्ये छत्रपतींच्या भूमिकेत ऋषभ शेट्टी देवीसमोर उभा असलेला दिसत आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक संदीप सिंग यांनी हे पोस्टर इंस्टाग्रामवर शेअर केले आहे. हे पोस्टर शेअर करत त्यांनी लिहिले की, 'जय भवानी! जय शिवाजी! हर हर महादेव!! सर्वश्रेष्ठ योद्धा राजा, भारताचा अभिमान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५व्या जयंतीनिमित्त, आम्ही पहिला लूक सादर करत आहोत. यामध्ये त्या ऐतिहासिक राजाचे सामर्थ्य आणि भक्ती दर्शवली आहे, ज्याने संपूर्ण उपखंडाचे भाग्य बदलले. हा एक सन्मान आहे की आम्ही त्यांची असामान्य वीरता, सन्मान आणि स्वराज्याची गाथा एका अद्वितीय टीमसह पडद्यावर आणत आहोत.' 'दी प्राइड ऑफ भारत - छत्रपती शिवाजी महाराज' चित्रपट २१ जानेवारी २०२७ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट हिंदीसह कन्नड, तेलुगु, तमिळ, मराठी, मल्याळम आणि बंगाली भाषेत प्रदर्शित होईल. या चित्रपटातील इतर कलाकारांची नावं अद्याप समोर आलेली नाहीत.

# समंथा रक्त ब्रम्हांडमध्ये दिसणार ॲक्शन करताना



दाक्षिणात्य अभिनेत्री समंथा प्रभू हि राज आणि डीके यांनी दिग्दर्शित केलेल्या सिटाडेल या वेब सीरिजमध्ये दिसली होती. ही एक ॲक्शन सिरीज होती. या सिरीजमध्ये समंथाने ॲक्शन सीन केले होते. आता पुन्हा एकदा एका नव्या सिरीजमध्ये समंथा ॲक्शन करताना दिसणार आहे. तिच्या नव्या सिरीजचे नाव रक्त ब्रम्हाड असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आता समंथाची नवी ॲक्शन सिरीज रक्त ब्रम्हांड कधी रिलीज होणार याची तिचे चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. समंथाने पुन्हा त्याच दिग्दर्शकांसोबत दुसरी वेब सीरीज साइन केली आहे, त्या वेबसिरीजचे नाव रक्त ब्रम्हांड असून राज आणि डीके ही जोडगोळी या सिरीजचे दिग्दर्शन करणार आहे. आता पुन्हा एकदा रक्त ब्रम्हाड या नव्या सिरीजमधील समंथाच्या रोल काय असणार याची देखील उत्सुकता तिच्या चाहत्यांना लागलेली आहे. समंथा रुथ प्रभूने काही काळापूर्वी शूटिंगमधून ब्रेक घेतला काही खास वेळ एकटीने घालवण्यासाठी ती परदेशात गेली होती. आता ती परतली असून रक्त ब्रम्हांडच्या शूटिंमध्ये सहभागी झाली आहे. तथापि, तेलुगूमध्ये, तिने अद्याप तिच्या पुढील चित्रपटाची घोषणा केलेली नाही आणि आगामी काळात ती तिच्या चाहत्यांसाठी कोणता विशेष प्रोजेक्ट घेऊन येत आहे याची तिचे चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत.

# सलमान-ॲटलीचा ५०० कोटीचा चित्रपट डब्बाबंद?

सुपरस्टार सलमान खान लवकरच दिग्दर्शक ॲटली कुमारच्या ॲक्शन ड्रामामध्ये दिसणार असल्याची चर्चा मागील काही दिवसांपासून सुरू होत्या. सलमान व ॲटलीच्या या चित्रपटाचे बजेट ५०० कोटी रुपये असल्याचे देखील सांगितले जात होते. तसेच, चित्रपटाला सध्या 'ए ६' नाव देण्यात आले होते. परंतु, आता हा ॲक्शन ड्रामा चित्रपट बंद होण्याच्या मार्गावर आहे. अभिनेता शाहरुख खान हा ॲटलीच्या 'जवान' या चित्रपटात दिसला होता. 'जवान'ने बॉक्स ऑफिसवर प्रचंड कमाई केली. त्यामुळे सलमानचे चाहते आवडत्या अभिनेत्याला ॲटलीच्या नवीन चित्रपटामध्ये पाहण्यास उत्सुक होते. या मेगा बजेट चित्रपटात अभिनेता रजनीकांत किंवा कमल हासन हे देखील सलमानसोबत स्क्रीन शेअर करण्याची शक्यता होती. मात्र, आता हा चित्रपट बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जाते. सलमान आणि ॲटलीचा हा चित्रपट आता होणार नाही.

वरुण धवनचा 'बेबी जॉन' सिनेमाला बॉक्स ऑफिसवर कमाई करण्यात अपयश आल्यानंतर ॲटलीने हा निर्णय घेतला आहे. सध्या तो सलमानऐवजी दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुनसोबतच्या नवीन चित्रपटावर लक्ष केंद्रित करत आहेत. 'जवान'नंतर चाहत्यांना सलमानला देखील अशाच ॲक्शन ड्रामामध्ये पाहण्याची इच्छा होती. मात्र, सध्या तरी या चित्रपटावरील काम थांबवण्यात आले आहे. भविष्यात सलमान-ॲटलीची जोडी पुन्हा एखाद्या चित्रपटासाठी एकत्र येऊ शकते.

# सिद्धार्थ-भरतची जोडी पुन्हा येणार भेटीला

चित्रपटसृष्टीत नवनवीन विषयांवर आधारित वेगळ्या धाटणीच्या कथानकावर आधारित चित्रपट सध्या प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. यामध्ये हेमंत ढोमे दिग्दर्शित 'फसक्लास दाभाडे' पासून 'इलू इलू १९९८' या चित्रपटाचा समावेश आहे. आता यामध्ये आणखी एका चित्रपटाची भर पडणार आहे. 'आता थांबायचं नाय' असे या चित्रपटाचे नाव आहे. या चित्रपटातून प्रेक्षकांचे लाडके कलाकार पुन्हा एकदा एका नव्या भूमिकेतून भेटीला येणार आहेत. 'आता थांबायचं नाय' या चित्रपटाचा एक टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. हा चित्रपट शिक्षणावर आधारित असल्याचे सिनेमाच्या नावावरून तसेच टीझरमधून दिसत आहे. नुकत्याच पार पडलेल्या झी गौरव पुरस्कार सोहळ्यात या चित्रपटाचा फर्स्ट लूक पाहायला मिळाला होता. हा चित्रपट सत्य घटनेवर आधारित असल्याचे म्हटले आहे. आता थांबायचं नाय चित्रपटाचे दिग्दर्शन शिवराज वायचाळ यांनी केले असून उमेश कुमार बन्सल , बवेश जानवलेकर, निधी परमार हिरानंदानी आणि धरम वालिया यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. सिद्धार्थ जाधव व भरत जाधव यांची पहिली झलक चित्रपटाच्या टीझरमध्ये दिसत आहे. टीझरमध्ये सर्वजण एका दिशेने पळत असल्याचे दिसत आहे. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आहे. हातात कसलेतरी पान दिसत आहे. त्यामुळे चित्रपटाची गोष्ट नक्की काय असणार, चित्रपटात नेमके काय पाहायला मिळणार, हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. सिद्धार्थ जाधव व भरत जाधव यांच्याबरोबरच प्राजक्ता हनमगर, किरण खोजे, प्रवीण डाळिंबकर, ओम भुतकर, पर्ण पेठे आणि आशुतोष गोवारीकर हे कलाकार प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.





# ...ते आपल्याला पाण्यात बघतात

बालकलाकार म्हणून अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवणारा अभिनेता पुष्कर जोग सध्या विविध चित्रपटांची निर्मितीदेखील करताना दिसत आहे. लवकरच तो 'हार्दिक शुभेच्छा' या चित्रपटातून पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात अभिनेत्री हेमल इंगळे प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाची चांगलीच चर्चा रंगली आहे. पुष्कर जोग त्याच्या चित्रपटांमुळे चर्चेत असतोच, मात्र त्याच्या वक्तव्यांमुळेदेखील तो चर्चांचा भाग बनतो. अभिनेत्याने अनेकदा मराठी चित्रपटसृष्टीत एकी असली पाहिजे यावर वक्तव्य केले आहे. आता याआधी अनेकदा अभिनेत्याने मराठी चित्रपट ऑस्करमध्ये नेण्याच्या महत्त्वाकांक्षेबद्दल वक्तव्य केले आहे. अभिनेता पुष्कर जोगने नुकतीच एका पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी बोलताना अभिनेत्याने म्हटले, एवढ्या वर्षांचा जो राग आहे किंवा मराठी इंडस्ट्री, मराठी प्रेक्षकांबद्दल मला जे प्रेम आहे, ज्या प्रेक्षकांनी मला प्रेम दिलं, मी महाराष्ट्रीय असल्याचा मला अभिमान आहे. मला खूप राग येतो की साऊथ इंडियन फिल्म किंवा बॉलीवूडवाले आपल्याला पाण्यात बघतात. ते विचार करतात, मराठी इंडस्ट्रीमधील लोक काय बनवणार. मी लंडनमध्ये फिल्म शूट करायला लागलो. माझी 'ती अँड ती' ही पहिली फिल्म होती, जी लंडनमध्ये शूट झाली. अनेकांनी परत तिथे शूटिंग केले. लंडनमध्ये शूटिंग करण्याचं कारणच हे होतं की मी भारती विद्यापीठात शिकलो. तिकडे मला दिल्ली, पंजाबमधील मुलं म्हणायचे की तुमच्या मराठी चित्रपटातील गाणी ही फिल्म सिटीमधील गार्डनमध्ये शूट होत असतील ना? तर ते माझ्या डोक्यात राहिलं. मला असं वाटतं की, मराठी इंडस्ट्रीमध्ये जे टॅलेंट आहे ते दुसर्‍या कुठल्याच इंडस्ट्रीमध्ये नाहीये. कलाकार असो वा दिग्दर्शक, आपली मराठी इंडस्ट्री उत्तम आहे; फक्त आपल्याकडे बजेटची कमी आहे. एकी नाहीये, त्यामुळे मी ठरवलंय की मी एक चित्रपट नक्की करणार आहे. तो माझ्या पहिल्या चित्रपटाचा सिक्वेल आहे. 'जबरदस्त २' या चित्रपटाच्या स्क्रीप्टवर मी गेले दोन वर्ष काम करत आहे. मी मार्वेल्स तसेच अवेंजर चित्रपटांचा मोठा चाहता आहे. जेव्हा राजामौली सर ऑस्करमध्ये जाऊन म्हणतात की, आरआरआर ही तेलुगु फिल्म आहे, मलासुद्धा तिकडे जाऊन म्हणायचं आहे की हा माझा मराठी चित्रपट आहे, जय हिंद जय महाराष्ट्र; हे मला ऑस्करच्या हॉलमध्ये जाऊन म्हणायचं आहे. मी प्रयत्न करतोय, त्यासाठी मी खूप मेहनत करतोय, असे म्हणत ऑस्करमध्ये मराठी चित्रपट जावा, यासाठी प्रयत्न करत असल्याचे पुष्करने म्हटले.

# प्राजक्ता झाली लग्नासाठी तयार



मराठी सिनेसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री प्राजक्ता माळी सध्या 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटामुळे खूप चर्चेत आहे. या चित्रपटात प्राजक्ता अभिनेता स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहेरे, प्रथमेश शिवलकर, रोहित माने, वनिता खरात यांच्यासह झळकणार आहे. प्रसाद खांडेकरने 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचं दिग्दर्शन केलं असून २८ फेब्रुवारीला हा प्रदर्शित होणार आहे. अशातच प्राजक्ताला एका शेतकरी मुलाने लग्नाची मागणी घातल्याचं समोर आलं आहे. एका कार्यक्रमात प्राजक्ता सहभागी झाली होती. यावेळी तिने लग्नाला तयार असल्याचं सांगत आईला मुलं बघण्याची परवानगी दिल्याचं म्हटलं. एवढंच नव्हे तर तिला दोन मुलांनी पत्राच्या माध्यमातून लग्नाची मागणी घातली आली आहे. त्यातील तिला एका शेतकरी मुलाचं पत्र आवडल्याचं स्पष्ट केलं. प्राजक्ता माळी म्हणाली, माझ्यासाठी मुलं शोधण्याकरिता अखेर मी आईला आता परवानगी दिली आहे. ही ब्रेकिंग न्यूज आहे. काही दिवसांपूर्वी मी उडतं उडतं असंच कुठेतरी बोलले होते, तर आईला खरंच दोन पत्र आली आहेत. मला ती पत्र इतकं आवडली आहेत. मला असं वाटतंय त्यांना फोन लावावा. कारण त्यातील एका पत्रामध्ये त्यांनी खूप प्रांजळपणे म्हटलेलं आहे की, मी शेतकरी आहे. मला माहिती आहे हे वेगळ्या पद्धतीने बोलतोय. तुमचं क्षेत्र वेगळं आहे. पण मला हे प्रांजळपणे मांडायचं आहे, मी शेतकरी आहे. मी शेतीचं करणार, तुम्हाला आवडणार असेल तर मला तुमच्याशी लग्न करायचं आहे. मला हे पत्र इतकं आवडलं की म्हटलं, हे किती गोड आहे. त्यामुळे मी आता मुलं बघण्यासाठी मना केली नाहीये. आधी मी म्हणायचे, तुम्ही डोकेदुखी नका करू. माझ्या डोक्याला ताप देऊ नका. पण, मी आता प्रवाहप्रमाणे जातेय. तुला वाटतंय असं करायचं, आणच शोधून. मी बघतेचतयार होईल. पण जेव्हा होईल तेव्हा होईल. होईल तरी उत्तम आणि नाही होईल तरी उत्तम, असं प्राजक्ता माळी म्हणाली. दरम्यान, प्राजक्ता माळीच्या 'फुलवंती' चित्रपटाला नुकतंच 'झी चित्र गौरव २०२५' सोहळ्यात गौरविण्यात आलं. 'फुलवंती' चित्रपटाला तब्बल सहा पुरस्कार मिळाले.

**अगदी प्रारंभापासून, मराठी कलावंतांचा भारतीय चित्रपटसृष्टीचा उगम व विकास यात मोलाचा वाटा राहिला आहे. भारतीय भूमीत चित्रपट बनवण्याचे शिवधनुष्य यशस्वीरीत्या उचलणारे दादासाहेब फाळके (राजा हरिश्चंद्र १९१३) व त्याही अगोदर दादासाहेब तोरणे (पुंडलिक १९१२) निर्माण करणारे अध्वर्यू मराठी होते. 'प्रभात'ने स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये आपली लखलखीत नाममुद्रा उमटवली होती. कथाकार, दिग्दर्शन, संगीत-दिग्दर्शन, संकलन या क्षेत्रामध्ये मराठी कलावंत आपले वर्चस्व व स्थान राखून होते. पण, अभिनय क्षेत्रात, विशेषतः हिंदी चित्रपटात मराठी कलावंतांना पडद्यावर यथायोग्य स्थान मिळाले नाही, ही वस्तुस्थिती!**



## मी असा कसा वेगळा..!

# अष्टपैलू, बहुपेडी, बहुरूपी अशोक सराफ

मराठी नाटके व चित्रपट आपल्या अभिनयाने गाजवलेल्या मराठी नायकांना हिंदी चित्रपटात तेवढ्या तोलामोलाच्या भूमिका मिळाल्या नाहीच. वर्षानुवर्षे हा अनिष्ट पायंडा हिंदी चित्रपटसृष्टीत कायम आहे. तसे पाहिले तर मराठी अभिनेते व अभिनेत्री यांच्या वकूब आणि क्षमता याबद्दल आदरानेच बोलले जाते, पण तरीही हिंदी चित्रपटातील मुख्य नायकाची भूमिका क्वचितच मराठी चित्रपटातील यशस्वी नायकास मिळाल्याचे आपणास आढळते. हा ऊहापोह करण्याचे कारण म्हणजे मराठी नाटके व मराठी चित्रपटांमध्ये आपल्या चतुरस्र, अष्टपैलू अभिनयाने गेली ५० वर्षे रसिकांना रिझवणार्या अशोक सराफ यांना मिळालेला 'पद्मश्री' पुरस्कार!

वयाच्या ७७ व्या वर्षी अशोक सराफ यांना मिळालेला 'पद्मश्री' पुरस्कार एका परीने त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव असला, तरीही त्यांना हा पुरस्कार फार अगोदरच मिळायला हवा होता, हे कोणीही सुज्ञ रसिक कबूल करेल. मराठी भाषेत, एखाद्याचा मामा करणे म्हणजे त्यास सहज मूर्ख बनवणे, परंतु अशोक सराफ हे चिरकाल मामा म्हणूनच संबोधल्या जातात व त्यात केवळ आदर आणि आदरच असतो. भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीच्या थोड्याच दिवसांपूर्वी म्हणजे ४ जून १९४७ रोजी जन्मलेल्या अशोक सराफ यांचे बालपण मुंबईत इतर सर्वसामान्य बालकांसारखेच होते. एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या अशोक सराफ यांना त्या काळी प्रचलित असलेल्या मेळे व गणेश उत्सवात अभिनय कलेची ओळख झाली व ते अभिनय क्षेत्रात मुशाफिरीस सज्ज झाले. मराठी संस्कारांमुळे काटकसर, तडजोड स्पष्टवक्तेपणा व अस्मिता प्राणपणाने जपण्याची वृत्ती अशोक सराफ यांच्यामध्ये वृद्धिंगत झाली. त्यावेळेसच्या शिरस्त्यानुसार अगोदर शिक्षण व तद्नंतर कायमस्वरूपी नोकरी यास प्राधान्य देऊन त्यांनी भारतीय स्टेट बँकेत नोकरी स्वीकारली, पण अभिनयाची भूक त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. प्रचंड धावपळ करून व जीवाला कष्ट देऊन त्यांनी नोकरी व रंगभूमी या दोन्ही बाजू तोलून धरल्या. 'हमीदबाईची कोठी' नाटकाने त्यांच्यातील अभिनयगुण प्रकर्षाने रसिकांच्या नजरेत भरले. मराठी चित्रपटांमध्ये त्यांचा प्रवेश १९६९ साली झाला. 'जानकी', 'दोन्ही घरचा पाहुणा', 'पांडोबा पोरगी फसली', 'वरात' हे त्यांचे सुरुवातीचे काही चित्रपट. पण त्यांचा बोलबाला सुरू झाला तो 'पांडू हवालदार', 'तुमचे आमचे जमले', 'नवरा माझा ब्रह्मचारी' व 'राम राम गंगाराम' या चित्रपटांपासून! अतिशय सहजतेने व अद्भुत अभिनयाने अशोक सराफ यांनी आपल्या विनोदी भूमिकांनी रसिकांना तृप्त केले. समर्पक देहबोली व अचूक समयावधान या आयुधांच्या जोडीने डोळ्यांचा अतिशय प्रभावी वापर ही अशोक सराफ यांची खास वैशिष्ट्ये! त्याचबरोबर त्यांची संवाद फेक म्हणजे क्या कहने!

मरगळलेल्या मराठी चित्रपटसृष्टीस नवसंजीवनी देण्याचे महत्कार्य अशोक सराफ यांनी केले, ते 'धूमधडाका' या महेश कोठारे दिग्दर्शित चित्रपटातून. या चित्रपटातील त्यांची 'विख्खी वुख्खु व्याख्या' करणारी यदुनाथ जवळकर ही भूमिका प्रचंड गाजली. लक्ष्मीकांत बेर्डे व सचिन पिळगावकर यांच्यासमवेत त्यांनी मराठी चित्रपटसृष्टी जिवंत ठेवली, हे मात्र नि:संशय! मराठी चित्रपटांमध्ये तरी अशोक सराफ यांच्यासारखा उच्च दर्जाचा व लोकप्रिय अभिनेता सापडणे कठीण. या परिप्रेक्ष्यात अशोक सराफ यांची हिंदी चित्रपटातील कारकीर्द बघितली तर एकंदरीत हिंदी चित्रपटसृष्टीचा मराठी अभिनेत्यांकडे बघण्याचा सापत्न भाव ठसठशीत दिसून पडतो. हिंदी चित्रपटांचे वितरण क्षेत्र व पर्यायाने प्रभाव क्षेत्र विस्तृत असतेच असते. व्यावसायिकता हा हिंदी चित्रपटसृष्टीचा स्थायीभाव आहे. निर्मिती खर्च, मराठी चित्रपटांच्या तुलनेत प्रचंड म्हणावा इतका असतो. विविध प्रांतांच्या विशिष्ट आवडी निवडीचा लघुत्तम विभाजक काढताना मराठी अभिनेते सर्वंकष प्रभाव प्रेक्षकांवर पाडू शकत नाही, असा पूर्वापार समज आहे. तसेच, हिंदी चित्रपटांची संस्कृती (२००० पर्यंत तरी) ही भाई-भतिजावाद जोपासणारी होती. कंपूशाही सर्वदूर विद्यमान होती.

मराठी कलावंत बहुतांश अल्पसंतुष्ट (भौतिक बाबींमध्ये तरी) असतो. सहसा आपल्या परिघाबाहेर जाणे त्याला रुचत नाही. 'ताठ कणा' व 'फटकळपणा' हे गुणदेखील मराठी कलावंतांना लाभलेले असतात. अर्थात, मराठी व्यावसायिक कलावंत हे मुख्यत्वे मुंबई व पुणे येथील व्यावसायिक वर्तुळात कार्यरत असतात. तसेच, मराठी व्यावसायिक नाटके व त्यांची सुदृढ अर्थव्यवस्था मराठी कलावंतास कोणत्याही तडजोडी करून काम मिळविण्याची गरज जवळपास संपुष्टात आणतात. दूरचित्रवाणी वाहिन्यांनी व्यावसायिक कलावंतांना दीर्घ कालावधीसाठी नियमित काम मिळण्याची एक शाश्वती प्रदान केली आहे. तरीदेखील मराठी कलावंतांना त्यांच्या गुणांनुसार अभिनयाच्या संधी मिळत नाही. अशोक सराफ यांनी 'दामाद' (१९७८) चित्रपटापासून आपली हिंदी कारकीर्द प्रारंभ केली. सुरुवातीला 'मेरे बीबी की शादी', 'अबोध', 'मुद्दत', 'प्रतिघात', 'घर घर की कहानी', 'बडे घर की बेटी' अशा चित्रपटांमध्ये फुटकळ भूमिकाच त्यांना मिळाल्या. नाही म्हणायला 'करन अर्जुन' चित्रपटातील त्यांच्या 'ठाकूर तो गयो' या संवादाला चिरंतन मूल्य लाभले. याच दशकात कोयला, गुप्त, येस बॉस, आशिक या चित्रपटात त्यांना बऱ्या भूमिका मिळाल्या. नवीन सहस्रकात २०११ साली आलेल्या 'सिंघम' चित्रपटात त्यांना हेड कॉन्स्टेबल प्रभू सावरकर ही लक्षवेधी भूमिका मिळाली. अशोक सराफ यांनी दूरचित्रवाणी मालिकांमध्येही आपला ठसा उमटवला आहे. 'छोटी बडी बाते' (१९८६) मधील मामू, 'आ बैल मुझे मार' (१९८७), 'हम पांच' (१९९५), 'प्रोफेसर प्यारेलाल' (१९९९), 'डोंट वरी हो जायेगा' (२०००) व सध्या प्रक्षेपित होत असलेली 'अशोक मा. मा.' (ही मालिका त्यांच्याभोवती केंद्रित आहे) ही त्यांची छोट्या पडद्यावरील लक्षणीय कामगिरी! तब्बल ४ फिल्मफेअर पुरस्कार, ११ महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार, संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार (२०२२), २०२३ सालचा 'महाराष्ट्र भूषण' हा बहुमान मिळविणार्या अशोक सराफ यांची कारकीर्द अजूनही पहिल्याच जोमाने सुरू आहे. प्रख्यात अभिनेते अशोककुमार यांच्यावरून अशोक नाव ठेवलेले अशोक सराफ, बऱ्याच बाबतीत त्यांना केव्हाच मागे टाकून पुढे गेलेले आहेत. 'मी बहुरूपी' हे त्यांचे आत्मकथन नितांत वाचनीय आहे. सहज सुंदर अभिनय, सुजाण प्रस्तुती, संस्कारी वर्तणूक, महानायक अशोक सराफ! (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

**देवेंद्र प्रभुणे**

# सचिन पिळगांवकरांना काम मिळत नसल्याची खंत




आपल्या अभिनयाने मागील अनेक दशकं प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन करणारे प्रतिभावान अभिनेते म्हणजे सचिन पिळगांवकर होय. त्यांनी आतापर्यंत अनेक सुपरहिट चित्रपट मराठी इंडस्ट्रीला दिले आहेत. त्यांनी हिंदीतही खूप काम केलं आहे. ६७ वर्षांचे सचिन पिळगांवकर यांनी एक खंत व्यक्त केली आहे. कोणी अभिनयासाठी विचारत नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे. सचिन पिळगांवकरांचा आगामी चित्रपट कोणता आहे, ते कोणत्या चित्रपटात दिसणार आहेत? असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला होता. त्याबद्दल ते म्हणाले, सध्यातरी आता मी पडद्यावर येणार नाही. कारण सध्या माझ्याकडे तसं काही काम नाहीये. मला कोणी अभिनेता म्हणून घेतही नाहीये. माझ्याकडे कोणी येतही नाही. तुम्ही आमच्याकडे अभिनेता म्हणून काम करा, असं मला कोणी सांगतही नाही. का येत नाहीत, हे मला माहिती नाही. मी अभिनय सोडला आहे, असं कदाचित त्यांना वाटत असेल. पण तसं नाहीये. 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटाच्या ट्रेलर लाँच कार्यक्रमात त्यांनी ही खंत व्यक्त केली होती. सचिन पिळगांवकर यांनी काही महिन्यांपूर्वी त्यांचा सुपरहिट चित्रपट 'नवरा माझा नवसाचा' या चित्रपटाचा दुसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला आणला होता. यावेळी सचिन म्हणाले, नवरा माझा नवसाचा ३ हा चित्रपट यायला हवा, असं लोकांना वाटत असेल तर त्यासाठी मी नक्कीच प्रयत्नशील असेन. प्रेक्षकांच्या ज्या अपेक्षा आहे, त्या पूर्ण करायची ऊर्जा मला गणपती बाप्पा नेहमीच देत असतो. मला गणपती बाप्पाकडून नवरा माझा नवसाचा ३ सिनेमा करण्याचा आदेश कधी मिळतोय, याची मी वाट पाहतोय. तो आदेश मिळेल याची मला खात्री आहे. प्रेक्षकांना या सिनेमाचा तिसरा भाग पाहायचा असेल तर तो आणणार, असं त्यांनी म्हटलं आहे.



# राजकुमार राव सुद्धा बनणार ॲक्शन हिरो

अभिनेता राजकुमार राव त्याच्या पुढच्या चित्रपटात एका गुंडाची भूमिका साकारणार आहे. चित्रपटाचे नाव 'मलिक' आहे. या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून प्रेक्षक त्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. हा चित्रपट जूनमध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. निर्मात्यांनी नवीन पोस्टर शेअर करून चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. फिल्म्सच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून एक पोस्ट शेअर करण्यात आली आहे. यामध्ये, चित्रपटातील राजकुमार रावचा लूक शेअर करण्यात आला आहे. हा अभिनेता हातात बंदूक धरून एका तीव्र लूकमध्ये दिसत आहे. त्यासोबतच्या कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'मलिक' संपूर्ण राज्य आणि देशावर राज्य करण्यासाठी येत आहे. यासोबतच, हा चित्रपट २० जून २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. राजकुमार राव यांच्या 'मलिक' चित्रपटाची कथा सामाजिक मुद्द्यांवर आधारित असल्याचे म्हटले जाते. ते ॲक्शन आणि साहसाने भरलेले असेल. या चित्रपटात राजकुमारचे दोन वेगवेगळे लूक दिसतील असेही म्हटले जात आहे. हा चित्रपट कुमार पुलकित दिग्दर्शित करणार आहे. त्याचबरोबर, मानुषी छिल्लर राजकुमार रावसोबत चित्रपटात एका महत्त्वाच्या भूमिकेत दिसू शकते. चित्रपटाचे पोस्ट-प्रॉडक्शनचे काम सुरू आहे. चित्रपटाच्या पोस्टरला वापरकर्त्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. एका वापरकर्त्याने लिहिले, 'हा राजकुमारचा चित्रपट आहे, मला तो पहायचा आहे'. दुसऱ्या एका वापरकर्त्याने लिहिले, 'राज येत आहे'. अभिनेता राजकुमार यांच्याकडे 'भूल चुक माफ' हा चित्रपट देखील आहे, जो १० एप्रिल रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. यामध्ये त्याच्यासोबत वामिका गब्बी दिसणार आहे.

# इमरान हाश्मी घेऊन येतोय मॉर्डन लव्हस्टोरी



अभिनेता इमरान हाश्मीला घेऊन दिग्दर्शक महेश भट्ट यांनी मर्डर चित्रपट २००४ मध्ये रिलीज केला होता. या चित्रपटातून अभिनेता इमरान हाश्मीला लॉन्च करण्यात आले होते. या चित्रपटाने इम्रानला एक वेगळी लोकप्रियता मिळवून दिली. त्यानंतर इम्रान हाश्मीने राज द मिस्ट्री, गँगस्टर सारखे चित्रपट दिले. या सर्व चित्रपटांना प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आणि या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवरही चांगली कमाई केली. मिड डेच्या रिपोर्टनुसार, इमरान भट यांच्या ट्विस्टेड म्युझिकल कथेवर काम एका चित्रपटात काम करणार आहे. विशेष भट्टचा हा दुसरा दिग्दर्शकीय प्रोजेक्टर असणार आहे. यापूर्वी त्याने 'मर्डर ३'मधून दिग्दर्शनात पदार्पण केले होते. हा चित्रपट इमरानसाठी घरवापसीसारखा असणार आहे. मिड डेनच्या सूत्रांच्या हवाल्याने इमरान गेल्या एका वर्षापासून विशेष फिल्म्सच्या कार्यालयात येत आहे. तो आणि विशेष भट्ट एका चित्रपटावर चर्चा करत आहेत. गेल्या आठवड्यात इम्रान पुन्हा विशेषच्या ऑफिसमध्ये आला होता. दोघांनीही मिळून काही चित्रपट शॉर्टलिस्ट केलेले आहेत. पण विशेष भट्ट यांना जो चित्रपट फायनल करायचा आहे ती एक मॉर्डन लव्हस्टोरी असणार असल्याची माहिती मिळत आहे. त्या स्टोरीमध्ये डार्क ट्विस्ट असणार आहेत. या चित्रपटाचे नाव अद्याप फायनल झाले नसले तरी हा चित्रपट विशेष भट्ट याने लिहिला आहे. सर्व गोष्टी जुळून आल्यास या चित्रपटावर मार्च अखेरपर्यंत काम करण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे.

# आता कंगनाने 'या' व्यवसायात केले पदार्पण

बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणौतने तिच्या अभिनयाद्वारे इंडस्ट्रीमध्ये स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. याशिवाय, तिने राजकारणातही प्रवेश केला आहे. आता कंगनाने नवीन व्यवसायात पदार्पण केले आहे.

कंगनाने हिमाचलच्या टेकड्यांमध्ये नवीन रेस्टॉरंट सुरू केले आहे. कंगनाने तिच्या या रेस्टोरंटला 'द माउंटन स्टोरी' असे हटके नाव दिले आहे. या हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांना भारताच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीची चव चाखता येणार आहे.

अप्रतिम निसर्गसौंदर्याच्या सानिध्यात असलेल्या या रेस्टोरंटमध्ये ग्राहकांना स्थानिक पदार्थांचा आस्वाद घेता येणार आहे. द माउंटन स्टोरी. ओपनिंग नाईट. एक स्वप्न साकार झाले. ज्यांनी मला हे साध्य करण्यासाठी मदत केली, त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. नक्की भेट द्या, असे कॅप्शन देत कंगनाने रेस्टोरंटमधील काही खास फोटो शेअर केले आहेत. व्हॅलेंटाइन डे च्या निमित्ताने हे हॉटेल ग्राहकांसाठी सुरू झाले आहे. हे रेस्टोरंट सुरू करण्याबाबत कंगनाने सांगितले होते की, तिचे लहानपणापासूनच रेस्टॉरंट सुरू करण्याचे स्वप्न होते. अन्नाच्या माध्यमातून माणूस लोकांशी जोडला जातो. तेही एक प्रकारचे प्रेमच असते. रेस्टॉरंट सुरू करणे वाईट नाही, पण कधी कधी त्याकडे केवळ व्यवसाय म्हणून पाहणे चुकीचे ठरते. कंगनाच्या रेस्टोरंटमध्ये येणाऱ्या ग्राहकांना सिड्डू, स्टफ्ड तंदूरी आलू पराठा, आलू पुरी, पोहे, वडापाव, पकोडा, भजी, स्ट्रीट स्टाइल नूडल्स, मूग डाळ विथ राईस, माह की दाल, दम मद्रा, कद्दू का खट्टा, कढी पकोडा, मटर पनीर, बटर नान आणि बदना गोड यासह अनेक पदार्थांचा आस्वाद घेता येईल.

